जावक क्र. ४८४९/२०१९
हडपसर पो. स्टेशन पुणे शहर
दि. २८/०४/२०१९

**प्रती,**

**मा. जनसंपर्क अधिकारी सो**
**पुणे शहर ( प्रेस रूम )**

**प्रतिवेदक – एन. एम. ढवळे, पो. हवा. ४३८२ हडपसर पालीस स्टेशन, पुणे शहर**
**यांज कडून विनंती पूर्वक की,**

**विषय – बेवारस मयत पुरूषाचे नातेवाईकाचा तपास होणे बाबत.**

२/- हडपसर पो. स्टे. अ.मयत रजिस्टर नंबर- १२४/२०१९ सी.आर.पी.सी. १७४ मधील बेवारस पुरूष वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे हे दि. २७/०४/२०१९ रोजी ससाणेनगर, हडपसर येथिल डी मार्टच्या रोडला, ग्लायडींग सेंटरच्या भिंतीजवळ बेशुध्द अवस्थेत मिळुन आलेने त्यांना ससुन हॉस्पीटल येथे खाजगी ॲम्ब्युलन्सने उपचाराकरीता आणले असता तिथे डॉक्टरांनी त्याला एम.एल.सी.नं. ९६१६/२०१९ अन्वये ॲडमिट केले असता तो डॉक्टर तपासणीपुर्वी मयत झाल्याचे डॉक्टरांनी १७.४० वा. घोषित केले. त्यांचे एम. एल. पी. एम. नंबर २०९५/२०१९ अन्वये पोस्ट मार्टेम झाले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

एक अनोळखी इसम **वय**- अंदाजे ५५ते ६० वर्षे, नाव व पत्ता माहीत नाही, **रंगाने-** सावळा, **केस**- काळे पांढरे व डोक्याच्या मध्यभागी टक्कल, **बांधा-** मध्यम, **उंची** अंदाजे ५.५ फुट, **दाढी-** बारीक काळी पांढरी, **चेहरा-** उभट **अंगात**- पांढऱ्या रंगाचा शर्ट व काळया रंगाची पँट जवळ पैसा अडका अगर मौल्यवान वस्तु नाही अथवा कोणत्याही प्रकारचा पेपर नाही.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा अनोळखी इसम वर नमूद केले तारखेस वेळी व ठिकाणी बेशुध्द अवस्थेत मिळुन आलेने त्यांना ससुन हॉस्पीटल येथे खाजगी ॲम्ब्युलन्सने उपचाराकरीता आणले असता तिथे डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले आहे. तरी त्याचे वारसाचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.